| | |
|---|---|
| **Publication**: Mumbai Choufer | Page no: 07 |
| **Edition:** Print | **Date:** 02.09.22 |


# एंटरप्रेन्योर ऑफ द इअर पुरस्काराची लवकरच घोषणा

मुंबई- श्वाब फाऊंडेशन फॉर सोशल एंटरप्रेन्योरशिप आणि ज्युबिलियंट भारतीय फाऊंडेशनने १३व्या सोशल एंटरप्रेन्योर ऑफ द इअर अवॉर्ड २०२२च्या अंतिम फेरीत पोहोचलेल्या स्पर्धकांची नावे जाहीर केली. यामध्ये ओसामा मंझर (डिजिटल एम्पॉवरमेंट फाऊंडेशन) अजयता शाह (फ्रंटिअर मार्केट्स), अनिकेत डोएगर (हकदर्शक), विल्मा रॉड्रिग्ज (साहस झीरो वेस्ट आणि एनजीओ साहस), मीरा शेणॉय (युथ फॉर जॉब्ज), असे संभाव्य विजेते आहेत. १३व्या सोशल एंटरप्रेन्योर ऑफ द इअर (एसईओवाय) भारत २०२२ पुरस्कारांची घोषणा १५ सप्टेंबर, २०२२ रोजी पार पडणार असून, या सोहळ्यामध्ये पुरस्कार विजेत्याची घोषणा केली जाईल. या पुरस्कार सोहळ्यामध्ये या ध्येयवेड्या व्यक्तींनी समाजाला दिलेल्या असाधारण योगदानाचे कौतुक करण्यासाठी व त्यांचे यश साजरे करण्यासाठी विविध क्षेत्रांत कार्यरत असलेलेल जगभरातील मान्यवर उपस्थित असणार आहेत.